# जागतिकीकरणातील लोकप्रशासनाची भूमिका

प्रा.डॉ.ए.बी.जगदाळे एस.जी.एम.कॉलेज, कराड.

...........................................................................................................................................

प्रस्तावनाः–आधुनिक राज्ये कल्याणकारीराज्ये झालेली आहेत. परिणामतः सर्वच राज्यांच्या कार्यक्षेत्रात प्रचंड वाढ झालेली आहे. त्यामुळे राज्यांना मानवी जीवनाच्या सर्वांगीण विकासामध्ये सकारात्मक भूमिका घ्यावी लागत आहे. त्यासाठी देशात लोककल्याणकारी विविध योजना,उपक्रम,कार्यक्रम राबविले जातात. प्राचीन काळातील राज्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित स्वरुपाचे होते. परंतु, आज लोकप्रशासनास त्यांच्या नव्या जबाबदा–यांमुळे नवीन पैलू प्राप्त झालेले आहेत. ते जनतेच्या सुखदुःखाशी वचनबध्द झाले आहे. 'जबाबदार' व 'जागरुग' या शब्दाशी लोकप्रशानाचा संबंध दृढ झाला आहे. प्रत्येक राज्याला कार्यक्षम प्रशासकीय यंत्रणा उभारावी लागते. नागरिकांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा प्रयत्नशील असलेली दिसून येते. लोकप्रशासनाचा संबंध व्यक्तीच्या सर्व क्षेत्रांशी आलेला आहे. जन्मनोंद पासून मृत्युनोंद व मधल्या सर्व नोंदीशी त्यांचे नाते जोडलेले आहे. आधुनिक जगातील विकसनशील व विकसित देशांमध्ये लोकप्रशासनाकडे 'सर्व प्रकारचे परिवर्तनाचे साधन' म्हणून पाहिले जाते. समाजातील सर्व प्रश्नांची सोडवणूक करण्याची जबाबदारी लोकप्रशासनावर असते. कल्याणकारी राज्य निर्माण करण्यामध्ये अपयश आले तर त्याचा दोष प्रशासनाकडे जातो.

इ.स.1919 च्या भारत सरकारच्या कायद्यात लोकप्रशासन निर्मितीचा संदर्भ दिसून येतो. तो आशय म्हणजे प्रशासनाच्या प्रत्येक शाखेत भारतीयांचा सहभाग वाढविण्यात येईल. तसेच ब्रिटिश साम्राज्याच्या एक अविभाज्य भाग म्हणून भारतात जबाबदार शासन निर्माण करण्याच्या दृष्टीने हळूहळू स्वयं शासनासंस्थांचा विकास करण्यात येईल. इ.स.1947 नंतर स्वतंत्र भारतातील लोकप्रशासन उदयास आले. भातरच्या राजकीय व्यवस्थेत बदल होत असताना येथील ब्रिटिशकालीन संस्थांनी आपले अस्तित्व टिकवून ठेवले. समाजातील अन्य कोणत्याही संस्थांपेक्षा प्रशासकीय संस्था आधिक स्थिर व दीर्घकालीन टिकणा–या असतात. भारतातील परिस्थिती त्याला अपवाद नाही. भारताच्या नव्या शासनाची उद्दिष्टे आणि ध्येये प्रत्यक्षात राबविणारी प्रशासकीय यंत्रणा मात्र नव्या राज्यकार्त्यांनी निर्माण केली नाही. भारताचे लोकप्रशासन यंत्रणा राजकीय धोरणाची चौकट या दोहोंमधील हे असंतुलन आहे. भारताने जेव्हा 1947 च्या ऑगस्टमध्ये 'नियतीशी करार' केला तेव्हा या देशातील लोकप्रशासन यंत्रणा आजारी अवस्थेत होती. देशाची फाळणी झालेली असल्यामुळे जातीय दंगलीला उधाण आले होते. लोकप्रशानाच्या दृष्टीने हा अत्यंत कसोटीचा काळ होता याच काळात अनेक मुस्लिम व युरोपिय आधिका–यांनी प्रशासनातील राजीनामे दिले. त्यामुळे शासनयंत्रणेतील मोक्याच्या जागा रिक्त झाल्या. इ.स.1950 च्या सुमारास योजना आयोग व राष्ट्रीय विकास परिषद यांची स्थापना करण्यात आली. इ.स.1956 मध्ये औद्योगिक धोरणविषयक ठराव संमत केला. या संक्रमणातून भारतीय प्रशासनाची प्रदीर्घ विकासात्मक वाढ झाली. इ.स.1980 नंतर जगातील बहुतेक राष्ट्रांनी आपल्या अर्थव्यवस्थेत आमुलाग्र बदल केले आहेत. सध्याच्या एल.पी.जी. च्या युगात स्पइमतंसप्रंजपवदए त्मअपजंसप्रंजपवद ळसवइंसप्रंजपवद म्हणजेच अनुक्रमे उदारीकरण, खाजगीकरण जाकतिकीकरण या सर्वच पातळीवर प्रशासकीय निर्बंध शिथिल होत आहेत व विकासाला गती मिळत आहे. ही वस्तुस्थिती आहे व त्यामुळेच राष्ट्रीय प्रशासनाची आवश्यकता कमी झाली आहे काय? या प्रश्नाची उकल होणे महत्तवाचे आहे. उदारीकरणामध्ये सरकारकडे फक्त देखरेख व संरक्षण हे कार्य आले आहे. अर्थव्यवथेच्या कोणत्याही क्षेत्रात शासनाने अनावश्यक हस्तक्षेप करु नये. शासनाने प्रामुख्याने आयात–निर्यात, उत्पादन यावर कोणतीही नियंत्रणे लादू नयेत. विदेशी विनियम बाझार, शेतीमालाचा बाजार, आर्थिक व श्रम बाजार यामधील अडथळे दूर करणे म्हणजे आर्थिक उदारीकरण होय. जगातील अन्य देशांनी खुला व्यापार असणे व देशांअंतर्गत खासगी क्षेत्रावर कोणतेही निर्बंध असता काम नयेत ही उदारीकरणाची भूमिका अविकसित राष्ट्रांना स्विकारावी लागत आहेत.

लोकप्रशासनाच्या बदलत्या भूमिकेमध्ये खाजगीकरण घटकाला विशेष महत्तव प्राप्त होत असल्याचे दिसून येते. सर्वाजनिक मालकीवर खाजगी मालकी प्रस्थापित करणे, खाजगी प्रशासन प्रस्थापित करणे व सुधारणा करणे, कार्यक्षमता वाढविणे ही काळाजी गरज झालेली आहे. जगातील अविकसित राष्ट्रे खाजगीकरणाकडे आकर्षित झाली आहेत. व त्याचे फायदेही दुष्टोपत्तीस येत आहेत. उदाहरणादखल सन 1991–92 च्या अखेरीस भारतातील 246 सर्वाजनिक उद्योगातील गुंतवणूक 99,315 कोटी रुपयांची होती. त्यातील काही मोजक्या उद्योगांनाच नफा मिळविता आला, हे नुकसान भरुन काढण्यासाठी सरकारला खाजगीकरणाकडे वळावे लागले.

जागतिकीरण हा शब्द जगभरात प्रगतीचा, विकासाचा, परवलीचा शब्द झाला आहे. राष्ट्राच्या राजकीय सीमेबाहेर आर्थिक व्यवहाराचा विस्तार करणे, अर्थव्यवस्थेवरील शासकीय नियंत्रण कमी करणे, विदेशी बहुराष्ट्रीय कंपन्याच्या गुंतवणुकीला सर्व क्षेत्रात मुक्त प्रवेश असा जागतिकीकरणाचा भारताच्या कृषि क्षेत्रावरील झालेला परिणाम लक्षणीय ठरतो. जागतिकीरकरणामुळे कृषिक्षेत्राचा समतोल विकास शेतमालास योग्य भाव मूल्य मिळून शेतक–यांच्या अर्थिक परिस्थितीत व्यापक बदल होईल, कृषिक्षेत्रातून बारमाही रोजगार मिळेल, ग्रामीण भागातील उपलब्ध साधनसामग्रीचा सुयोग्य वापर होऊन बळीराज सुखी जीवन जगेल असा जो विश्वास अर्थतज्ज्ञ,राज्यकर्ते यांनी व्यक्त केला होता, तो खोटा ठरत आहे (2) उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणामुळे राष्ट्राराष्ट्रांमध्ये उदार अर्थिक संबंध निर्माण होऊन आर्थिक विकासाला चालना मिळते हे

भारत सरकारच्या लक्षात आल्यानंतर सन 1991 पासून वेळोवेळी आर्थिक धोरणात बदल करुन भारतीय अर्थव्यवस्था प्रगत करण्याचा प्रयत्न केला. जागतिक व्यापार संघटना व इतर सर्व देश यांच्यात त्या दृष्टीने करार करण्यात येऊ लागले. सर्वासाठी समान न्याय मग ते देश विकसित, अविकसित असोतं, या कारणामुळेच जागतिकीकरण हानीकारक ठरत आहे. जगात एकीकडे आर्थिकदृष्टया संपत्र राष्ट्र तर दुसरीकडे गरीब राष्ट्र अशी परिस्थिती असताना सर्वाना एकच न्याय हे तत्व कुठपर्यंत फायद्याचे ठरणार याचा विचार केला नाही. या शिवाय दुस–या बाजूला जागतिक व्यापारात आपला हिस्सा मुळातच कमी आहे. उदाहरण द्यावयाचे म्हटले तर जागतिक व्यापारात अमेरिकेचा हिस्सा 40 टक्के तर भारताचा केवळ 5 टक्के अश परिस्थितीत आपण विकास करणार कसा ? या प्रश्नाकडे गांभिर्याने पाहिले नाही.

जागतिकीरणामुळे विदेशी कृषिमाल व फळे भारतात मोठया प्रमाणात येतात. मात्र आपली कृषिक्षेत्रातील निर्यात देशाच्या जाचक अटी व नियमांच्या तरतुदींमुळे कमी होते. भारतीय फळांचे निर्जतुकीकरा होत नाही म्हणून अमेरिका, जपान इ. देशातील बाजारपेठेत त्यांच्या विक्रीसाठी मज्जाव केला जातो. भारतीय कृषिक्षेत्राने विविध वनौषधे, वनफळे,संगंधी वनस्पती इ. च्या जाती, प्रजाती विकवित केल्या आहेत. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेअगोदर अनेक विदेशी कंपन्या या प्रजाती संशोधनासाठी आपल्या देशात देऊन गेल्या आणि त्यात सुधारणा करुन प्रचंड किंमतीने आपणास विकल्या. त्यामुळे शेतक–यांची या बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून आर्थिक पिळवणूक झाली.

कृषिक्षेत्राच्या दृष्टीने सबसीडी हा मुद्दा जागतिकीरकरण व जागतिक व्यापार संघटनेच्या दृष्टीने महत्वाचा आहे. आज खुल्या व मुक्त स्पर्धेचा उपदेश करणारे देश भारताला सबसिडी कमी करण्यास सांगून स्वतःमात्र वाढवित आहेत. त्यामुळे बाजारपेठेत जागतिक पातळीवर कृषि उत्पादनाच्या किंमती ते कृत्रिमरित्या कमी करतात. उदा. 1994 मध्ये साखरेचा भाव 400 डॉलर प्रतिटन होता. 1999–2000 मध्ये तो 200 डॉलर तर गव्हाचा भाव 160 डॉलर प्रतिटनावरुन 80 ते 100 प्रतिटन झाला. त्यामुळे पदरेशात कृषिमाल विकण्यात अडचणी येतात.

स्वातंत्र्यपूर्व काळात राष्ट्रीय उत्पादनाचा शेतीचा वाटा 50 टक्के होता. आज केवळ 26 टक्के इतकाच आहे. आज एकीकडे शेतमालाच्या उत्पादनात प्रचंड वाढ होत आहे तर दुसरीकडे कुपोषण व गरिबीमुळे लाखो लोकांची उपासमार होत आहे तर त्याच बरोबर बेरोजगारी व शेतीमालास मातीमोल भाव यामुळे देशभरात शेतकरीवर्ग आत्महत्य करत आहे. 1999 – 2000 मध्ये आंध्रप्रदेशातील 400 कापूस व तंबाखू उत्पादकांनी आत्महत्य केली. 2005 – 2006 मधील महाराष्ट्रातील शंतक–यांच्या आत्महत्त्येची अकडेवारी भयावह आहे. जगातील गरीबी, बेकरी व उपासमार दूर करुन आर्थिक विकासाचे स्वप्न बाळगणा–या संस्था, जागतिक बॅक, आंतराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक व्यापार संघटना व त्यांना भांडवलाचा पुरवडा करणारे मोजके देश यांचा हेतूक मुळी साम्रज्यावादी असून गरिबांना गरीब करणारा व श्रीमंताना श्रीमंत करणार आहे. अर्थिक विकास तसेच व्यापारवृध्दी यांच्या नावाखाली कामगार, अल्पभूधारक,लहानशेतकरी, भूमिहीन शेतमजूर यांना अधिक लाचार व आर्थिकदृष्टया परावलंबी केले जात आहे (3)

स्पर्धा हा जागतिकीरकणाचा केंद्रबिंद्र आहे. परंतु अनुभव मात्र नेमा उलटा आहे. जागतिकीकरणाचा आधार घेऊन बहुराष्ट्रीय कंपन्या स्थानिक बाजारपेठेत प्रवेश मिळवितात व हळूहळू स्पर्धक संपवित जातात. शीतपेयांची 99 टक्के बाजारपेठ पेप्सी व कोकाकोला या दोन कंपन्यांकडे आहे. आईस्क्रिमची 71 टक्के दोन बहुराष्ट्रीय कंपन्यांकडे आहे. जागतिकीरकणात मक्तेदारीकडे वाटचाल दिसून येये. 1960 – 70च्या शतकात प्रतिवर्षो उत्पादन 8000 ते 10000 मोटारींचे होते होते. परंतु, तेवढे उत्पादन एका दिवासात सहजपणे करणारी फोर्ड कंपनी भारतात आली. अशा महाकाय विदेशी कंपन्यांशी स्पर्धा करणे स्थानिक उद्योगांना अवघड झाले आहे. 2005 मध्ये एका वर्षात 500 पेक्षा जास्त कारखाने बंद पडले. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत वसाहतवादाचा नवीन अवतार जन्माला आला आहे. असे म्हटले जाते 18 व्या व 19 व्या शतकात ब्रिटिश,डच,फ्रेंच कंपन्यानी जे केले तेच 21 व्या शतकात बहुंराष्ट्रीय कंपन्या जागतिकीकरणाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करत आहेत.

आजची आपली अर्थव्यवस्था उदारीकरण, खाजगीकरण, व मुक्त व्यापार यांना मान्यता देत आहे. ही व्यवस्था सन 1990 पासून स्वीकारली आहे. आपल्या राष्ट्राची धोरणे ठरविणारी राज्यव्यवस्था या सर्वांना प्रोत्साहन देत आहे व हातभार लावत आहे. कारण त्यातही राज्यव्यवस्था चालविणा–या लोकांचा स्वार्थ आहे. त्यामुळे या सर्व आंतराष्ट्रीय संस्थांच्या हातातील बाहुले बनण्यास त्यांना विधीनिषेध वाटत नाही. सन 2003 साली देश बचाओ, देश बनाओ यासाठी केरळातून निघालेल्या मोर्चात सर्व राज्यातून लोक सहभागी झाले होते. त्या ध्येयापर्यत जाण्यासाठी फार मोठया क्षेत्रात वेगवेगळे कायम स्वरुपाचे कार्यक्रम हातामध्ये घेणे आवश्यक आहे. आज आपल्या देशातील यंत्रोद्योग कमी होत चालले आहेत. बेकारी वाढत आहे. तसेच या धोरणांमुळे श्रीमंत व गरीब यामधील दरी वाढत चाललेली आहे. सर्वसामान्य लोकांची अनेक प्रकारे पिळवणूक होत आहे की, जे विशेषतः दरिद्री आहेत. प्रगतीच्या नावावर चाललेली ही अधोगती आहे. ही तथकथित प्रगती देशाबाहेरील प्रगत देशांनी लादली आहे.(4) जागतिक बॅक, आंतराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक व्यापार संघटना या संस्थांद्वारे ती लादली गेली आहे. जगातील अविकसित व विकसनशील देशातील जनतेच्या ही गोष्ट लक्षात येऊ लागली आहे. याचा परिणाम म्हणून जागतिक सामाजिक संघटना ॅवतसक ैवबपंस थ्वतनउ ची स्थापना झाली आहे. सरकारी मदत घेता ही स्वयंचलित संस्था गरिबांचे हाल, उपेक्षा व आर्थिक अन्याय

या क्षेत्रात काम करीत आहे. प्रगत राष्ट्रे आपल्यासारख्या दुस–या व तिस–या जगातील राष्ट्रावर अतिक्रमण करत आहेत. स्वतःच्या सवार्थासाठी त्यांना इतर सर्व राष्ट्रातील अर्थव्यवस्था ताब्यात घ्यावयाची आहे.

लोकप्रशासनातील निर्माण झालेल्या आव्हानांना तोंड देण्यासाठी आज भारतामध्ये नवलोकप्रशासनाची गरज आहे. ही संकल्पना प्रथम अमेरिकेतून आली. 1970 नंतर नवलोकप्रशासनाची सुरुवात झाली. मानव हा लोकप्रशासनाच्या केंद्रस्थानी मांडला. नवलोकप्रशासन आपले चार विचार प्रदर्शित करते (5)

सामाजिक जीवनाशी निगडीत असलेले व सामाजिक जीवन सुसहय करण्यास हातभार लावणारे लोकप्रशासनच उपयुक्त व अर्थपूर्ण असू शकते हा महत्त्वाचा विचार जो पूर्वी डावलला जात होता, तो नवलोकप्रशासनाने जोरकसपणे मांडला. राज्याचा एकूण करउत्पात्रांपैकी 15 टक्के उत्पत्र रजिस्टेशन व स्टॅप विभागातून मिळते. सन 1895 पासून 1 कोटी 50 लाख रजिस्टर्स कागदपत्रे त्यांच्या मालकाकडे पाठविली नाहीत. परंतु, ई रजिस्ट्रेशनचा प्रयोग महाराष्ट्र राज्यात यशस्वी झाला आहे ई – गव्हर्नन्स अंतर्गत मंत्रालयापासून तालुका पातळीपर्यत सर्व सरकारी कार्यलये इंटरनेट जोडयात येणार आहेत. कल्याण,डोंबिवली महानगरपालिकेने नागरिक साहारूय केंद्राद्वारे नागरिकांना विविध त–हेचे दाखले देणे, कर गोळा करणे अशा योजना ई – प्रशासानाच्या सहाय्याने यशस्वी करुन दाखविल्या आहेत. कर्नाटकमध्ये इ – प्रशासनामध्ये 'भूमी या प्रकल्पाद्वारे शेतक–यांना त्यांच्या जमिनीचे मालकी हक्काचे कागदपत्रे देण्याची व्यवस्था केली आहे.

प्रशासकीय कार्यातून नवीन जीवनमूल्ये समाजात झिरपणे शक्य आहे असाा विश्वास नवलोकप्रशासनाच्या अभ्यासकांना वाटतो. भारतीय प्रशासनातील निर्वाचन आयुक्त टी.एन.शेषन यांचे प्रशासन मूल्यांवर आधारित होते. आयुक्त झा यांचे पंढरपूर व पुण्यातील कार्य मूल्याधिष्ठित होते. समाज विकासासाठी जी जीवनमूल्ये आदर्श, उपयुक्त आहेत त्याचा लोकप्रशासनाने स्वीकार करावा व समाज विकासास हातभार लावला असा महत्तवपूर्ण विचार नवलोकप्रशासनाने मांडला.

समाजात सर्वांनाा समान न लेखता कमकुवत घटकांना झुकते माप प्रशासनाने द्यावे. कुमकुवत समाजघटांची कामे प्राधान्याने करावीत. समाजातील शेवटच्या स्तरातील माणसाच्या बाजूने प्रशासनाने उभे राहावे. प्रशासनाने उपेक्षितांना संधी मिळेल यासाठी प्रयत्न करावेत ही नवलोकप्रशासनाची भूमिका सकारात्मक आहे.

परिर्वतन हे नवलोक प्रशासनाचे महत्तवाचे तत्व असावे. विकसनशील देशात परंपरागत मनोरचनेतून समाजास आधुनिक करण्यासाठी प्रशासनास कार्यरत रहावे लागले. लोकप्रशासनात आज जी सकारात्मक, समाजभिमुखता, जनतेच्या सेवेची भावना दिसते त्याचे श्रेय नवलोकप्रशासनालाच द्यावे लागेल. आज प्रत्येक देशासमोर विषमता, गरिबी, बेकारी यासारखे गंभीर प्रशन आहेत. या प्रश्नांना सामोरे जाण्यासाठी खंबीर नवलोप्रशासन ही काळाजी गरज आहे.

जागतिकीकरणाच्या नियमावलीमध्ये अमेरिकेन स्वतःसाठी अनुकून बदल केले आहेत. भारतानेसुध्दा असाच बदल केला तर उद्‌भवलेल्या प्रशासनातील अनेक समस्यांवर मात करुन नवलोकन्रशासन हे एक उत्तम प्रशासन म्हणून नावलौकिक मिळवेल.

संदर्भः–

(1) योजना, ऑक्टो.2003 पृष्ठ 2 ते 7

(2) योजना, ऑगस्ट 2005, अंक 1 पृष्ठ 20 ते 29

(3) प्रा.डॉ.एन.डी. पाटील,'नवसाम्रज्यवादी युगातील भारतीय लोकशाही समोरील आव्हाने', विचारवेध संमेलन परभणी, अध्यक्षीय भाषण डिसें.2001.

(4) आचार्य शांताराम गरुड 'नव्या आर्थिक धोरणाचे राजकीय परिणाम', प्रबोधन प्रकाशन ज्योजी, इंचलकरंजी, जाने. 2001.

(5) विचारमंथन, 'महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद संशोधन पत्रिका',फेब्रु 2002